# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 21/01/2023 (शनिवार) दुपार

---

## सराईत गुन्हेगार आकाश कारेमोरे याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

### (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. बोरी अंतर्गत येणाऱ्या गांगापूर, टाकळघाट परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार आकाश संजय कारेमोरे वय २७ वर्ष रा. गांगापूर, टाकळघाट तह. हिंगणा जि. नागपूर हा मागील ८ वर्षापासून गांगापूर, टाकळघाट परिसरात गुंडगिरी करुन नागरिकांना त्रास देत होता. तो नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेला असायचा टाकळघाट परिसरात चोरी, घरफोडी, जबरी चोरी, नागरिकांना गंभीर दुखापत पोहचविणे, सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला करणे, महिलांची व मुलींची छेडखानी करुन विनयभंग करणे, बलात्कार करणे, अपहरण करणे, लोकांना जिवे मारण्याची धमकी देणे, प्राणघातक शस्त्रे जवळ बाळगुन गंभीर दुखापती पोहचविणे सारखे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक करुन कारागृहात पाठविले आहे. परंतु आकाश याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आकाश याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. आकाश याचे कृत्य सामाजिक सुव्यस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. २०/०१/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी आकाश कारेमोरे याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला त्यानुसार त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, श्री अशोक कोळी, ठाणेदार पो.स्टे. एम.आय.डी.सी. बोरी, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, निलेश बर्वे, विजय डोंगरे, मिलींद नांदूरकर, पोलीस नायक अमृत किनगे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर